Vol 5 Issue 4 Oct 2015 ISSN No :2231-5063

# International Multidisciplinary Research Journal

# Golden Research Thoughts

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

## Welcome to GRT

RNI MAHMUL/2011/38595 ISSN No.2231-5063

Golden Research Thoughts Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## *International Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.aygrt.isrj.org**

Golden Research Thoughts
ISSN 2231-5063

Impact Factor : 3.4052(UIF)
Volume - 5 | Issue - 4 | Oct - 2015

# रविकिरण मंडळाच्या साहित्य निर्मितीच्या प्रेरणा

First Author Details :

शांताराम शेलार

## प्रस्तावना

### 4) रविकिरणमंडळाच्या प्रेरणा :



इ.स. 1920 च्या दरम्यान नामवंत कवी 'ना.वा. टिळक', 'गोविंदाग्रज बालकवी', 'ए.पां.रेंदाळकर' हे दिवंगत झाले. त्यामुळे मराठी काव्यप्रांतात पोकळी जाणवू लागली. या दरम्यान नवनवे, तरूण व हौशी कवी काव्यलेखन करू लागले. वेगवेगळया नावाने त्यांनी काव्यमंडळे स्थापन करून वाङ्मय सेवा सुरू केली. पुण्यामध्ये मान्यवर अशा कवींनी 'श्री शारदा मंदिर' ही वाङ्मयविषयक संस्था स्थापन केली, त्यातील काही कवीनी रविकिरण मंउळ नावाने एक स्वतंत्र काव्यमंडळ सुरू केले. त्याद्वारे त्यांनी काव्यवाचन, रसग्रहण, वाङ्मयचर्चा व काव्यप्रकाशने इ. उपक्रम सुरू केले. इ.स. 1923 मध्ये रविकिरणमंडळाची स्थापना झाली. त्यामध्ये प्रामुख्याने 'मा. त्र्यं. पटवर्धन', 'शं. के.कानेटकर', 'य. दि.पेंढारकर', 'श्री. बा.रानडे', 'सौ.मनोरमाबाई रानडे', 'ग.त्र्यं. माडखोलकर', 'द.लं.गोखले', 'नाटयछटाकार दिवाकर'अशी साहित्यिक मंडळी सहभागी झालेली होती. काही कारणास्तव नाटयछटाकार दिवाकर यांनी मंडळ सोडले. त्यांचे जागी 'विठ्ठलराव घाटे' यांना मंडळात सामावून घेतले यापैकी फक्त पहिल्या तिघांनीच काव्यलेखनात भरीव अशी कामगिरी केली, रविकिरणमंडळाने मराठी काव्यक्षेत्राला मानाचे स्थान मिळवून दिले.

रविकिरणमंडळाची स्थापना ही एक सामाजिक व वाङ्मयविषयक अशी महत्त्वाची घटना मानली जाते. हौशी व तरूण कवींनी आणि काव्य रसिकांनी पुणे शहरात एकत्र येऊन व आपापला उद्योग , व्यवसाय व नोकरी सांभाळून एकत्र जमून काव्याच्या प्रसारासाठी संघटितपणे कार्य केले.

रविकिरणमंडळातील प्रत्येक कवीची काव्यनिर्मिती व्यक्तिपरत्वे तशी भिन्न स्वरूपाची होती. रविकिरणमंडळातील प्रमुख कवी म्हणजे 'रवी' म्हणून 'आचार्य अत्रे' यांनी 'माधव जूलियन' यांचा उल्लेख केलेला आहे.[1] (पहा. झेंडूची फुले ) माधव जूलियनांनी स्फुट व भावगितात्मक स्वरूपाची आणि दिर्घकाव्य, खंडकाव्यात्मक अशी विपुल काव्यरचना केलेली आहे. काव्यामध्ये सुनीत रचनेचा अभिनव प्रयोग त्यांनी केला. (तुटलेले दुवे) फार्सी धर्तीच्या गज्जलांचा संग्रह 'गज्जलांजली' या नावाने प्रसिध्द केला. यातील काही गझल फारसी गज्जलांचे विविधप्रकार मराठीत रूढ केले. त्याच्या इतर व विविध विषयावरच्या कविता 'स्वप्नरंजन', 'मधुलहरी' या काव्यसंग्रहात समाविष्ट आहेत. तसेच 'विरहतरंग'हे प्रेमविषयक खंडकाव्य, सुधारक हे उपहासपर व सामाजिक खंडकाव्य, 'नकुलालंकार' हे वाङ्मयीन झब्बूगिरीवरचे अपहास काव्य इ. लेखन प्रसिध्द आहे. उमर खय्यामच्या रूबायांचे मराठीकरण करून, त्या काव्याचा संदर्भ स्पष्ट केला.

कवी 'गिरीश' हे रविकिरणमंडळाचे दुसरे सदस्य होत. त्यांनी बरीचशी स्फुट रचना केली आहे. 'वीणा झंकार' 'स्वप्नलहरी', हे भावगीत संग्रह महत्त्वाचे मानले जातात. प्रेमानुभवापेक्षा थोर व्यक्ती, सादरणीय स्थळे, निसर्गसुंदर स्थळे व दृश्ये हे काव्यविषय त्यांना अधिक आवडलेले आहेत. ग्रामीण वातावरणाबद्दलही त्यांनाा प्रेम वाटे. 'अभागी कमळ', 'कला', 'आंबराई' ही त्यांची समाज जीवनावरील खंडकाव्ये होत. त्यातही विपुलता, गेयता व सुव्यवस्थितपणा हे त्यांच्या कवितेचे मुख्य विशेष आढळतात.

रविकिरणमंडळातील तिसरे सदस्य कवी म्हणजे यशवंत होत. त्यांनी स्फुट काव्ये रचली 'यशोधन' 'भावमंथन','यशोगंध' इ. नऊपेक्षा अधिक काव्यसंग्रह लिहिली. 'जयमंगला', 'बंदीशाला' व 'काव्यकिरीट' ही खंडकाव्ये लिहिली जीवनातील कटू अनुभवामुळे त्यांच्या काव्यातून नैराश्यवादाचा सुर आढळतो. बहुतांशाने भावगीतस्वरूपी असलेलया उत्कटता, मित अलंकारीकता व अचूक शब्द योजना हे मूळ त्यांच्या काव्यात आढळतात.

त्याचप्रमाणे 'श्री.बा.रानडे', 'मनोरमा रानडे', 'वि.द.घाटे', 'ग.त्र्यं.माडखोलकर', 'द.ल.गोखले' इ. चे काव्यही महत्त्वाचे मानले जाते. संख्येने जास्त ग्रंथ नसलेतरी त्यांची वाङ्मयीन कामगिरी महत्त्वाची मानली जाते.

रविकिरणमंडळाच्या वाङ्मयीन प्रेरणा व जाणीव आणि त्यांच्यावर झालेले संस्कार पाहिले असता, त्याच्यामधील 'सामुदायिक विचार' हाच प्रमुख व महत्त्वाचा मानला जातो. काव्यातील बहुमुखी व्यापक एकोपा हाच त्यांचा मोठा आधार होता. रविकिरणमंडळाच्या आगेमागे वातावरणातील समकालीन नामवंत कवींची काव्यरचना चालू होती. त्यामध्ये भा. रा. तांबे, कवी चंद्रशेखर हे कवी प्रभावी रचना

करीत होते.

समाजातील वास्तवाची जाणीव त्या कवींना जाणवू लागली होती. रविकिरणमंडळाला याचा स्पर्श नव्यानेच होत होता. भा. रा. तांबे महाराष्ट्रापासून दूर होते. त्यांची कविता म्हणाव्या तेवढया विपुल स्वरूपात नव्हती, सुरूवातीला ते प्रसिध्दीपासून अलिप्त राहिले होते. इ.स. 1920 मध्ये ' श्री. मायदेव ' यांनी तांब्यांचा पहिला कविता संग्रह संपादन करून प्रसिध्द केला, तेंव्हापासून त्यांचा साहित्य वर्तुळात परिचय झाला.

तांब्यांच्या कवितेचा पुढचा म्हणजे दुसरा भाग 'अज्ञातवासींनी' (दि.गं. केळकर) 1927 साली प्रसिध्द केला, या काळातील ताब्यांचे काव्यक्षेत्रातील स्थान रविकिरामंडळाच्यादृष्टीने समकालीन वृत्तीच्या संदर्भात महत्त्वाचे मानावे लागले. याच काळात कवी 'चंद्रशेखर' हे बडोद्याला काव्यरचना करीत होते. ते महाराष्ट्रापासून तसे दूरच होते. चंद्रशेखर तसे मोठे कवी मानले जातात. त्यांनी 1895 ला काव्यलेखनाला सुरूवात केली होती. तरी त्यांच्या काव्याचे वळण तसे जुनेच होते. 1895 पासून काव्यरचना करीत असले तरी 1932 पर्यंत तरी त्यांचा महाराष्ट्रातील काव्यक्षेत्रात परिचय झालेला नव्हता.

कवी 'बी' जन्मापासून विदर्भात राहिले. त्यांची कविता 1891 ला प्रकाशित झाली. त्यांच्या कवितेचा खरा बहर 1911 ते 1923 पर्यंतच राहिला. शिवाय त्यांची रचना अल्प प्रमाणात होती, पुढे 1913 नंतर त्यांच्या फारशा कविता प्रकाशित झाल्या नाहीत. त्या सर्वच कविता या विचार प्रधान मानल्या जातात. तत्त्वचिंतनपर रचना म्हणून त्या प्रसिध्द आहेत. 'बी' कवींचा पहिला संग्रह 1934 साली प्रसिध्द झाला.

व्यक्तिस्वातंत्र्याचा पुरस्कार करताना व्यक्तीला समाजाकडून अडथळा निर्माण होतो. रविकिरणमंडळाने त्याविरूध्द लिहिले. समाजाच्या काही प्रवृत्तीवर ताशेरे ओढले. समाजातील दंभ, अन्याय भ्रष्टाचार, रूढी इ. वर त्यांनी आपले साहित्य निर्माण केले. त्यांच्या साहित्यातून स्पष्टवक्तेपणा निदर्शनास येतो. निर्भीडपणा व निःसंकोच बुध्दी यामुळे त्यांनी समाजातील अनिष्ट प्रथा चव्हाटयावर आणल्या. उदा. 'माधव जूलियन' यांची कविता, 'यशवंत', 'गिरीश' यांच्या स्फुट रचना, माधवरावांचे 'सुधारक' खंडकाव्य, गिरीशांचे 'अभागी कमल' यशवंताचे 'गुलामाचे गाऱ्हाणे ' ' तुरूंगाच्या दारात ' इत्यादी प्रकारचे साहित्य.

'समाज आणि व्यक्ती' यांची दखल रविकिरणमंडळाने घेतली. राजकीय विचारसरणीचा त्यांच्या साहित्यातून म्हणावा तेवढा आविष्कार जाणवत नसला तरी त्यांचा प्रयत्न नाही.

रविकिरणमंडळाने प्रेमविषयाला साहित्यातून वेगळया वळणाने रंगविले. प्रेमविषयाचा विकास करण्याचा वेगळा प्रयत्न केला. प्रेमाची संकल्पना संकुचित न ठेवता, विस्तारित केली. निरपेक्ष प्रेमाचा अवलंब केला उदा. 'श्री—मनोरमा' हा 'श्री. बा. रानडे' व 'मनोरमा रानडे' यांचा संयुक्त काव्यसंग्रह हा याची उत्कृष्ट साक्ष होय.

स्फुट कवितेबद्दल जसे सांगता येईल, तसेच रविकिरणमंडळाच्या सामाजिक खंडकाव्याबद्दल सांगता येईल. सामाजिक 'खंडकाव्य' ही रविकिरणमंडळाने साहित्याला दिलेली फार मोठी देणेगी आहे. खरे पाहता समाजातील वास्तवता त्या साहित्यातून अवतरली. या संदर्भात ' सुधारक ' ' नकुलालंकार ' अभागी कमल , बंदिशाळा इ. खंडकाव्यांचा विचार करावा लागतो. एकूणच रविकिरणमंडळाच्या साहित्यातून समाजाला बोध मिळत गेला.

'सुनीत' या रचनाप्रकारचा मंडळाने विस्तार केला व प्रचार आणि पुरस्कारही केला. वेगवेगळया वृत्तात व मिश्र वृत्तात त्यांनी रचना केल्या. यासाठी माधवराव पटवर्धनाची सुनीतांजली व 'तुटलेले दुवे' हे काव्यसंग्रह मोलाचे आहेत. मंडळाने फार्सी या कवितेचा उपयोग केला. अरबी छंद : शास्त्राचा परिचय काव्यातून करून दिला.

अनुस्वाराऐवजी परसवर्णाचा स्वीकार केला. उदा. थंण्डगार, खुण्टी, लंङ्गोटी, नाङ्गर, चिन्ध्या, तोण्ड इ. शब्द. वापरून काव्यरचनेत नाविन्य आणले.

आतापर्यंत रविकिरणमंडळाचा उदय व विस्तार आणि विकासातील टप्पे पाहिले आता रविकिरणमंडळाच्या वाङ्मयीन कामगिरीचा परिचय करून घेणे अगत्याचे आहे.

### *संदर्भ – टिपा*

1) 1920 च्या ऑक्टोबरमध्ये ' महाराष्ट्र शारदा मंदिर '' ही साहित्यप्रेमी संस्था अनंततनय यांचा पुढाकार आणि अज्ञातवासींची आर्थिक मदत यामुळे अस्तित्वात आली. प्रत्यक्षात कार्य 1921 च्या जून महिन्यात सुरू झाले. 'रविकिरण गौरविका' — पुणे विद्यापीठ प्रकाशन — पृ. 3, 1965
2) दोन तपे — ग.त्र्यं. माडखोलकर. 1945
3) 3 नि. पृ. 183.
4) 3 नि. पृ. 143
5) 3 नि. पृ. 17.
6) लोकशिक्षण : फेब्रु — मार्च 1940
7) 3 नि. पृ. 27.

### *संदर्भ ग्रंथ*

1)रविकिरणमंडळ गौरविका घारपुरे कमुदिनी पुणे विद्यापीठ प्र?का?1965
2)दोन तपे — ग.त्र्यं. माडखोलकर —मॅजेस्टीक बुकस्टॉल मुंबई 1965
3)अर्वाचीन मराठी वाङ्मयसेवक प्र.खं.व्हीनस प्रका.पुणे 1966
4)दिवस असे होते वि.द.घाटे मौन प्रका. मुंबई 1961
5)सहकंप — पोतदार अनुराधा — मेहता पब्लिसिंग हाऊस पुणे 1982
6)रविकिरणमंडळाच्या वाङ्मयीन कार्याचे मूल्यमापन — (प्रबंध) — मुंबई विद्यापीळ 1974
7)आधुनिक कवी पु.1 ले : शिखरे दा. न. जयंतसामी कंपनी नवी पुणे 1968

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.aygrt.isrj.org